REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे. ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २२ मार्च, १९४४ अंक १२

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM
Guest House
Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### रेशनिंगमुळें वजन घटत नाहीं

युद्धजन्य रेशनिंगमुळें ब्रिटिश लोकांचें वजन घटत नाहीं; असें आढळून येतें. १९४०-४१ मध्यें मात्र, अन्नांत विविधता नसल्याकारणानें, लोकांची वजनें थोडीं कमी झालीं होतीं. शाळांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढ पूर्वीप्रमाणेंच समाधानकारक चालू आहे.

### बँकेंत सापाचीं अंडीं

बँकांच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें दागिने, रोकड रक्कम, महत्त्वाचे दस्तऐवज, रोखे, इत्यादि ठेवण्यांत येत असतात. लिव्हरपूल येथील एका बँकेकडे एका मनुष्यानें सापाच्या अंड्यांची पेटी व्हॉल्टमध्यें ठेवण्यासाठीं आणली, परंतु बँकेनें त्याची जोखीम स्वीकारली नाहीं. बंदिस्त खोलींतील उबेमुळें अंड्यांतून साप बाहेर पडावयाचे!

### चीन आगबोटी विकत घेणार व बांधणार

चीन देश युद्ध समाप्तीनंतर स्वतःच्या आगबोट-वहातुकीचा धंदा मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचा विचार करीत आहे. अमेरिकेकडून चीन ५०० मालवाहू आगबोटी विकत घेण्याच्या विचारांत आहे व अमेरिकन तज्ज्ञांचे नेतृत्वाखालीं स्वतः आगबोटी बांधण्याचीहि त्याची कल्पना आहे.

### धान्याचा साठा

कराची येथें व आणखी दोन केंद्रांत लक्षावधि टन धान्याचा साठा हिंदुस्थान सरकार करीत आहे, त्याचा उद्देश हें धान्य विशेष अडचणीच्या प्रसंगीं उपयोगांत आणतां यावें, असा आहे.

### सुएझ कालव्याखालून बोगदा

सुएझच्या कालव्याखालून बोगदा खणून त्यांतून रेल्वे नेण्याचा इजिप्तच्या सरकारचा विचार आहे. ह्या युद्धोत्तर योजनेस सुमारें २ कोटि रुपये खर्च येईल.

### हैद्राबाद को. इन्शुअरन्स सोसायटी

गेल्या वर्षी वरील कंपनीनें २९३ लक्ष रुपयांचें नवीन काम पुरें केलें.

### हिंदी तांदळाचें उत्पादन

१९३७ ते ४२ ह्या पांच वर्षांतील तांदळाच्या हिंदी उत्पादनाची वार्षिक सरासरी २ कोटि, ५४ लक्ष टन होती, १९४२-४४ च्या दोन वर्षांतील उत्पादनाची वार्षिक सरासरी २ कोटि, ७७ लक्ष टन पडली. चालू वर्षीतील उत्पादनाचा अंदाज ३ कोटि, ६ लक्ष टनांचा आहे. फक्त १९१७-१८ मध्यें ह्यापेक्षा जास्त तांदळाचें उत्पादन झालेलें होतें.

### कोहिनूर मिल्स कं. लि.

कोहिनूर मिल्स कं. लि. नें १९४३ सालीं ५ कोटि रुपयांच्या मालाची विक्री केली. १९४१ सालांतील विक्रीचा आकडा ३ कोटि, १७ लक्ष रुपये होता व १९४१ सालीं २ कोटि, ३१ लाखांची विक्री झाली होती. कंपनीला १९४३ सालीं १ कोटि, ८३ लक्ष रुपये ठोक नफा झाला. त्यापैकी १ कोटि, ३० लक्ष रुपये कर भरण्यासाठीं राखून ठेवले आहेत. मॅनेजिंग एजंट्स (मेसर्स किलिक निक्सन आणि कं.) ना कमिशनचे ८३ लक्ष रुपये मिळाले. भागीदारांस ४०% डिव्हिडंड मिळणार आहे.

### हिंदी सैनिकाचा पगार

हिंदी सैनिकांचा पगार सप्टेंबर, १९४२ मध्यें वाढविण्यांत आला होता, तो आतां पुनः वाढविण्यांत येत असल्याचें सर सेनापतींनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें जाहीर केलें. सैनिकाचा युद्धापूर्वी मूळ पगार १६ रु. आहे, तो तेव्हां १८ रुपये करण्यांत आला होता. पगार, लायकी-पगार, डिफर्ड पगार व भत्ता मिळून लढाईवर जाणाऱ्या सैनिकाचा पगार ३७ रु. ८ आ. होईल. हिंदुस्थानाबाहेर गेल्यास त्याला आणखी ७ रुपये मिळतील.

### इंडिया ऑटो ॲण्ड वर्क्स लि.

मोटारींची आयात व निर्गत करण्याच्या धंद्याची "दि इंडिया ऑटो ॲन्ड वर्क्स लि." नांवाची १० लक्ष रुपयांची खासगी लिमिटेड कंपनी शेठ गुलाबचंद हिराचंद ह्यांनीं नोंदविली आहे.

### प्राप्तीवरील कराचे नवीन दर

(इनकमटॅक्स, सुपरटॅक्स व सरचार्ज प्रमाणें १० हजारांवरील उत्पन्नास द्यावा लागणारा कर.)

| उत्पन्न | कर |
|---|---|
| ११,००० | १,१४३ |
| १२,००० | १,३३२ |
| १३,००० | १,५८१ |
| १४,००० | १,८०० |
| १५,००० | २,०१८ |
| १८,००० | २,८९२ |
| २१,००० | ३,७०६ |
| २४,००० | ४,५५० |
| २७,००० | ५,६४३ |
| ३०,००० | ६,८९२ |
| ३३,००० | ८,०८१ |
| ३६,००० | ९,४२५ |
| ४०,००० | ११,५५० |
| ५०,००० | १६,८९२ |
| ६०,००० | २२,६४३ |
| ७०,००० | २८,८९३ |
| ८०,००० | ३५,१४३ |
| ९०,००० | ४१,३९३ |
| १,००,००० | ४७,६४३ |
| १,५०,००० | ८१,२३७ |
| २,००,००० | १,१७,१७५ |
| ३,००,००० | १,९५,३०० |
| ४,००,००० | २,७६,५५० |
| ५,००,००० | ३,६०,९२५ |
| १०,००,००० | ८,२९,६७५ |
| २०,००,००० | १७,६७,१७५ |
| ३०,००,००० | २७,०४,६७५ |


→। दत्त कंपनी ।←

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. डाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ९० |
| २ संयुक्त हिंदी व्यापारी मंडळाचें मतप्रदर्शन ... | ९१ |
| ३ चेक पाठविण्यासाठी यंत्रांचा उपयोग ... | ९२ |
| ४ औंध स्टेट बँकिंग कंपनी | ९२ |
| ५ स्फुट विचार ... रस्त्यांच्या विस्ताराची योजना—रस्ते विस्तारांतील ठळक बाबी—रेल्वे-मोटार वहातुक | ९३ |
| ६ बँकांच्या ठेवी व त्यांनीं दिलेली कर्जे ... | ९४ |
| ७ भारत इं. बँक लि. ... | ९४ |
| ८ ऑस्ट्रेलियापुढील लोकसंख्येचा प्रश्न ... | ९५ |
| ९ मध्यप्रांतांतील उद्योगधंद्यांस वाव ... | ९५ |
| १० आयुर्विम्यास प्रारंभ ... | ९५ |
| ११ युद्धोत्तर शिक्षणाची योजना ... | ९५ |


# अर्थ

बुधवार, ता. २२ मार्च १९४४

## संयुक्त हिंदी व्यापारी मंडळाचें मतप्रदर्शन

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्या हिंदी व्यापारी मंडळाच्या संयुक्त संस्थेची वार्षिक परिषद् दिल्ली येथें नुकतीच भरली होती आणि तीमध्यें हिंदुस्थानच्या युद्ध परिस्थितींतील उद्योगधंदे व व्यापार ह्यांचे संबंधांतल्या महत्त्वाच्या प्रश्नांवर ठराव मान्य करण्यात आले. युद्ध चालू असतांना आणि युद्धोत्तर काळांत हिंदी धंद्यांबाबत सरकारचें धोरण कोणतें असावें ह्या विषयीं परिषदेनें विधायक सूचना केल्या. प्रातिनिधिक स्वरूपाचीं मंत्रिमंडळें देशांत स्थापन होण्याची आवश्यकता अध्यक्षांनीं प्रतिपादली आणि हिंदी आर्थिक हितसंबंधांची जोपासना जेणें-करून होईल असें धोरण सरकारनें अंगिकारावें ह्या आशयाची सूचना केली. परिषदेंत चर्चिल्या गेलेल्या विषयांमध्यें युद्धोत्तर पुनर्घटना, अन्नपुरवठा, युद्धकालीन नव्या धंद्यांची जोपासना, देशांत जरूरीचा माल तयार होण्याची आवश्यकता, हिंदुस्थानच्या लंडनमधील शिलकांचा योग्य विनियोग, हे प्रश्न प्रमुख होते.

हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीविषयींची पंधरा वर्षांची योजना औद्योगिक पुढाऱ्यांनीं तयार केली आहे तिला परिषदेनें हार्दिक पाठिंबा देणें उचित व अपेक्षित होतें. ही योजना म्हणजे आकाशांतला चंद्र नसून ती पूर्णपणें व्यवहार्य आहे आणि तिच्या योगानें सामान्य हिंदी जनतेची रहाणी सुधारण्याची खात्री आहे असे आत्मविश्वासाचे उद्गार वक्त्यांनीं काढले. ती अमलांत आणण्याची सध्याच्या सरकाराकडून कोणीहि अपेक्षा करीत नाहीं; त्यानें तिच्या मार्गांत अडथळे आणूं नयेत आणि आर्थिक बाबींविषयींचे विश्वसनीय आकडे तयार करून पुरवावे म्हणजे झालें असेंहि एका प्रमुख वक्त्यानें बोलून दाखवलें. धान्याचा पुरवठा व त्याची वांटणी ह्यांचे संबंधांत आपलें एकसूत्री धोरण सबंद देशभर अंमलांत येईल अशी व्यवस्था मध्यवर्ती सरकारनें करावी असें ह्या प्रश्नाबाबतच्या परिषदेच्या ठरावांत सुचवण्यांत आलें आहे. धान्याच्या निर्गतीची बंदी, त्याच्या आयातीची तरतूद आणि त्याच्या उत्पादनाचा विस्तार ह्या मार्गांचा अवलंब सरकारनें करावा आणि दुष्काळाची पुनरावृत्ति न होऊं देण्याची दक्षता बाळगावी असेंहि त्यांत म्हटलें आहे. युद्धकाळांत आवश्यक म्हणून काढण्यांत आलेल्या नवीन धंद्यांचें पुढें शांततेच्या युगांत काय होणार हा प्रश्न दूरदृष्टीनें विचार करण्यासारखा आहे. आज भाव चांगले आहेत आणि विशिष्ट मालास मागणी असतांहि त्याची आयात बंद किंवा मर्यादित झाली आहे म्हणूनच कित्येक धंदे निघाले आहेत किंवा विस्तार पावले आहेत. युद्धोत्तरकालीन परकीय स्पर्धेमुळें ते चालणें कठिण होणार आहे. तेव्हां सरकारनें त्यांस सहाय देण्याची व्यवस्था करून ठेवली पाहिजे. इंग्लंडमध्यें अशी तरतूद केली जात आहे तिच्या धर्तीवर खास समितीकडे अशा धंद्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सोपवावा असा अभिप्राय परिषदेनें प्रकट केला आहे.

जनतेच्या मामुली उपयोगाच्या जिनसांचा तुटवडा सध्यां तीव्रतेनें भासत आहे आणि हा माल बाहेरून आयात करावा लागतो. तसें करण्याच्या ऐवजीं स्वदेशी धंद्यांस लागणारीं यंत्रें व कच्ची सामुग्री आयात करून सरकारनें त्यांस पुरविली तर देशांतल्या देशांत जरूरीचे जिन्नस उपलब्ध होऊन हिंदी उद्योगांच्या प्रगतीस उत्तेजन मिळेल असें मत परिषदेंत व्यक्त करण्यांत आलें. युद्धकालीन कर योजनेचा देशी धंद्यांवर होणारा परिणाम लक्ष्यांत घेऊन करांची मांडणी व आकारणी केली जावी अशी सूचना परिषदेच्या एका ठरावांत नमूद आहे. अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचे दरम्यान होणाऱ्या देवघेवींत त्या देशाचें जें येणें निघतें तें अमेरिकेच्या नांवावर चढवून ठेवण्यांत यावें आणि त्याचें रूपांतर स्टर्लिंग पौंडांत केलें जाऊं नये अशी मागणी परिषदेनें केली आहे. अमेरिकेकडून घ्यावयाच्या डॉलर्सपैकीं कांहीं रक्कम ह्याप्रमाणें बाजूस काढून ठेवली जाईल असें आश्वासन सर जेरमी रेस्मन ह्यांनीं दिलें आहे. परंतु त्या येण्याची सबंध रक्कम हिंदुस्थानच्या उपयोगासाठीं खास बाजूस ठेवावी म्हणजे पुढें जरूरीप्रमाणें तिचा ह्या देशास उपयोग करतां येईल असें परिषदेचें म्हणणें आहे. ह्या संबंधांत ब्रिटिश व अमेरिकन धंदेवाल्यांची चुरस लागून राहिली आहे आणि हिंदुस्थानास मिळावयाच्या डॉलर्सचा उपयोग अमेरिकन व्यापारी करतील आणि ह्या देशाच्या बाजारपेठांत आपलें वर्चस्व स्थापतील अशी भीति ब्रिटिश धंदेवाल्यांस वाटत आहे. ह्या दृष्टीनें परिषदेच्या वरील मागणीचें रहस्य ध्यानांत येण्यासारखें आहे.

### यांत्रिक शक्तीवर चालणाऱ्या मागांची सवलत

जे स्वतःच्या गिरण्यांत सूत काढीत नाहींत, अशांच्या कापडाचे उत्पादनास किंमतीचें नियंत्रण लागू नाहीं. ज्यांचेजवळ १ जानेवारी, १९४४ रोजीं २५ पेक्षा कमी पॉवर लूम होते, अशांना ही सवलत चालू राहील परंतु ज्यांचेजवळ २५ अगर २५ पेक्षा अधिक माग होते, अशांची ही सवलत १ मे पासून रद्द होणार आहे. ह्या तारखेनंतर त्यांना आपल्या कापडावर किंमतीचे शिक्के मारावे लागतील.

### कपाशीची लागवड वाढली

हिंदुस्थानांतील कपाशीच्या लागवडींत १९४३-४४ मध्यें २% वाढ झाली. लांब धाग्याच्या कपाशीची लागवडच मुख्यतः वाढली आहे, ही विशेष मोठ आहे.

## अमेरिकन सैनिकाच्या कुटुंबीयांस चेक पाठविण्या-साठी यंत्रांचा उपयोग

### अठरा मजली इमारतींमधील प्रचंड कचेरी

फौजेंत दाखल होणाऱ्या प्रत्येक सैनिकास त्याच्या कुटुंबीयांच्या हितसंबंधाची काळजी सरकार वहात आहे, अशी खात्री वाटली, म्हणजे त्याचें चित्त स्थिर राहून त्याची कार्यक्षमताहि वाढते. ह्या गोष्टीच्या महत्त्वाची जाणीव अमेरिकन सरकारास आहे. सैनिकाची पत्नी, मुलें, वृद्ध माता-पिता, इत्यादींस वक्तशीर अलावन्स पोंचता करणें, त्यांच्या सर्व प्रश्नांस नीट उत्तरें देणें, त्यांच्या अडचणींत त्यांस मदत करणें, इत्यादींसाठी अमेरिकन सरकारनें "ऑफिस ऑफ डिपेंडन्सी बेनिफिट्स" (ओ. डी. बी.) ह्या नांवाची एक मोठी कचेरी स्थापन केली आहे. नेवार्क (न्यू जर्सी) येथील एका विमा कंपनीची १८ मजली प्रचंड नवी इमारत ह्या कचेरीच्या स्वाधीन करण्यांत आली आहे. कचेरींतील कामाची पद्धत अत्यंत नमुनेदार अशी आहे व त्यासाठी अद्यावत यंत्रांची योजना केलेली आहे, त्यांतून दरमहा ४० कोटि रुपयांचे २५ लक्ष चेक लिहून पाठविले जातात. चेक्सचा हा प्रवाह सैनिकास आपल्या कुटुंबीयांच्या खुशालीबद्दल निःशंक राखण्याचें महत्त्वाचें कार्य करीत असतो. सैनिकाच्या कोणत्या नातलगास किती रक्कम मिळावयाची, हें नियमांनीं ठरवून टाकलेलें असतें. सैनिकानें लिहून दिल्याप्रमाणें त्याच्या पगारांतून कापलेले पैसे वक्तशीरपणें त्याच्या कुटुंबीयांस पाठविले जातात अथवा सेव्हिंग्ज बँकेंत किंवा विमा कंपनींत भरले जातात. सार्जंटपर्यंतच्या दर्जाच्या सैनिकास आपल्या १७५ रुपये पगारांतून दरमहा ८० रुपये आपल्या पत्नीस धाडतां येतात व त्यांत अमेरिकन सरकार ९५ रुपयांची भर घालून पत्नीकडे १७५ रुपयांचा चेक पाठवितें. पहिल्या अपत्यास दरमहा ४२ रुपये व पुढील प्रत्येक अपत्यास ३५ रुपये मिळतात. सैनिकावर अवलंबून असलेल्या पित्यास अगर मातेस १३० रुपये व बहिणीस १०० रुपये मिळतात. आई, बाप, बहीण, इत्यादींस अलावन्स मिळावा, अशी सैनिकाची मागणी असेल तरच त्यांस तो दिला जातो, परंतु त्यापूर्वी हे नातेवाईक सैनिकावर खरोखरच अवलंबून आहेत, अशा अर्थाचा शपथपूर्वक दाखला त्यांत हितसंबंध नसलेल्याकडून घेतला जातो. परंतु, पत्नी व अपत्यें ह्यांच्या बाबतींत मात्र, सैनिकाची इच्छा नसली, पत्नीस स्वतःचें भरपूर उत्पन्न असलें व सैनिकाचें व त्याच्या पत्नीचें पटत नसलें तरीसुद्धा दरमहा १७५ रुपये मिळतात. त्यापैकीं अर्थातच ८० रुपये सैनिकाच्या पगारांतून काटलेले असतात. "ओ. डी. बी." मध्यें दररोज शेकडो स्त्री-पुरुष आपल्या अलावन्स संबंधीं चौकशी करण्यासाठी व शंकांचें समाधान करून घेण्यासाठी येतात. १५ लोक त्यांची समजूत करण्याचें काम दिवसभर करीत असतात. १० लोक टेलिफोनवरील प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत गुंतलेले असतात. स्वतः येणारे व पत्रानें चौकशी करणारे ह्यांचें प्रमाण एकास हजार असें पडतें. ह्या पत्रांची उत्तरें देण्यासाठी ७५० कारकुनांची योजना केलेली आहे. प्रत्येक पत्राचें उत्तर देण्यांत येतें. अमेरिकेच्या विधिमंडळांतील सभासदांनीं आपल्या मतदारांतर्फे लिहिलेलीं पत्रें मोजलीं तर त्यांची रोजची संख्या ३०० ते ४०० भरते. कित्येक सैनिकांचे कुटुंबीय लोक मदत नाकारतात; तेवढीच रक्कम सरकारला इतरांकेवर खर्चतां येईल, अशी त्यांची राष्ट्रीय भावना असते. कोणास किती रक्कम मिळावयाची, हें एकदां ठरलें, म्हणजे सैनिक, त्याचे नातेवाइक व त्यांस मिळावयाची रक्कम ह्या सर्वांस विवक्षित नंबर दिले जाऊन स्टेन्सिलवर ठराविक भोकांचे स्वरूपांत त्यांस चिरस्थायित्व प्राप्त होतें. कोणाची पत्नी मेली, कोणास मूल झालें, कोणाच्या कन्येचा विवाह झाला, कीं स्टेन्सिलमधला तपशील ताबडतोब बदलावा लागतो. परंतु, एकदा स्टेन्सिल तयार झालें, कीं त्यावरील भोकांच्या मार्गदर्शनानुसार यंत्रें बिनचूक चेक लिहितात, त्यांवर सहीहि यंत्रें करतात, स्टेन्सिलबरहुकूम चेक झाला किंवा नाहीं हें तपासण्याचें कामहि दुसरें एक यंत्रच करतें, पाकिटांत चेक घालून तें बंद करण्याचें कामहि यंत्रांकडेच आहे, इतकें नव्हे तर एकाच पाकिटांत दोन चेक जाऊन एखादें पाकीट कोरेंच जात नाहींना, ह्याची तपासणीसुद्धा यंत्रेंच करतात. एखाद्या पाकिटाबद्दल यंत्रास शंका आली, कीं तें पाकीट बाहेर फेकलें जातें. स्टेन्सिलवरील माहिती अचूक आहे किंवा नाहीं, हें पहाण्याचें व राखण्याचें काम तेवढें माणसांकडे आहे. यंत्रें चालविण्यासाठी तज्ञ लोकांची नेमणूक केलेली आहे.

---

### दि औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि.

३१ डिसेंबर, १९४३ अखेरच्या वर्षी वरील कंपनीच्या खेळत्या भांडवलांत दोन लाखांचेवर वाढ झाली आहे. निवळ नफ्याचा आकडा काढण्यापूर्वी प्राथमिक खर्च खातीं असलेले १ हजार रुपये पूर्णपणें काढून टाकण्यांत आले आहेत; औंध स्टेट बँकेच्या कर्जांत आलेली ४½ हजारांची तूट खर्चांत घातली आहे; बुडीत व संशयित फंडांकडे २,२४० रुपये वर्ग केले आहेत व ५५० रुपये थकित व्याज फंडाकडे जमा केले आहेत. हें सर्व करूनहि वर्षअखेर ६,१५७ रुपये निवळ नफा राहिला, त्यांत मागील वर्षांतील ३,०५५ रुपयांचा शिलकी नफा मिळवून नफा वाटणीसाठी ९,२१२ रुपये राहिले त्यांतून ४% डिव्हिडंडसाठीं ५,३९५ रुपयांचा विनियोग बोर्डानें सुचविला आहे. रिझर्व्ह फंडांत १,८६५ रुपयांची भर पडेल व १,३६६ रुपये पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढले जातील. अहवालाचे सालीं कंपनीनें केलेली प्रगति समाधानकारक आहे व वाढत्या खेळत्या भांडवलाबरोबर तिचा नफाहि वाढत जाईल हें उघड आहे. कंपनीचे ६ लक्ष रुपये रोख, बँकांत व सरकारी रोख्यांत आणि शेअर्समध्यें तरते आहेत आणि ह्या उलट कंपनीकडील ११½ लाखांच्या ठेवींपैकी फक्त ३½ लाखांच्या ठेवी सेव्हिंग्ज व करंट खात्यांतील म्हणजे सहज काढतां येण्याजोग्या आहेत, ही गोष्ट ताळेबंदावरून स्पष्ट दिसून येते. कंपनीच्या आटपाडी, विचूद, कुंडल व ओगलेवाडी ह्या चारहि शाखा फायद्यांत आहेत. संस्थानचें ट्रेझरीचें काम बँकेकडेच चालू आहे. कंपनीचें विमाखातें १९४१ सालीं बंद करण्यांत आलें, परंतु नांवांत फरक करण्याचा राहिला होता. तेव्हां कंपनीचें नांव ह्यापुढें "दि बँक ऑफ औंध लि." असें असावें, अशी बोर्डाची सूचना मंजूरीसाठी भागीदारांच्या विशेष साधारण सभेंत मांडण्यांत येईल. श्री. श्रीपादराव ओगले हे कंपनीचे अध्यक्ष असून श्री. बा. रा. वर्तक हे जनरल मॅनेजर आहेत. "दि बँक ऑफ औंध लि." ला आम्हीं सुयश चिंतितों.

# स्फुट विचार

## रस्त्यांच्या विस्ताराची योजना

शेती, उद्योगधंदे, व्यापार, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगति ह्यांच्या उत्तेजनासाठी स्वस्त व सुखाच्या वहातुकीच्या साधनांची आवश्यकता आहे. हिंदुस्थानांत हीं साधनें पुरेशीं व समाधानकारक नाहींत हें सुप्रसिद्ध आहे. रस्त्यांची लांबी वाढवणें व त्यांची सुधारणा करणें ह्या खर्चाच्या गोष्टी आहेत. पण युद्धोत्तर काळांत व्हावयाच्या सुधारणांच्या सामान्य कल्पना आतां आकाशांत उंच भराऱ्या मारूं लागल्याकारणानें शेकडो कोटि रुपयांच्या खर्चाचें कोणासहि विशेष वाटेनासें झालें आहे. युद्धपरिस्थितींत सरकारचा व व्यक्तींचा खर्च एवढा वाढला आहे कीं मोठ्या रकमा लोकांच्या मानसिक सवयीच्या झाल्या आहेत. हिंदी जनतेची उत्पादक शक्ति व प्राप्ति वाढल्यावांचून आणि तिचें करं देण्याचें सामर्थ्य निश्चितपणानें वाढल्यावांचून अवाढव्य खर्चाच्या राष्ट्रीय आर्थिक योजना तिच्या पचनी पडावयाच्या नाहींत हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. पंधरा वर्षें मुदतीच्या आभिवृद्धीच्या औद्योगिक पुढाऱ्यांनीं तयार केलेल्या योजनेंतहि मोठ्या खर्चाच्या रस्तेविस्तारास महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे. ह्या परिस्थितींत हिंदुस्थान सरकारचे मंत्री, सर महमद उस्मान, ह्यांनीं रस्त्यांच्या सुधारणेस लागणाऱ्या साडेचारशे कोटि रुपयांच्या अंदाजानें घाबरून जाण्याचें कारण नाहीं असें बोलून दाखवलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. गेल्या डिसेंबर महिन्यांत प्रांतिक चीफ इंजिनिरांची परिषद भरविली होती, तिनें ४५० कोटी रुपये खर्चून चार लक्ष मैल लांबीचे रस्ते वीस वर्षांत पुरे करण्याची योजना निश्चित केली आणि युद्धोत्तर पुनर्घटनेचा विचार करणाऱ्या मध्यवर्ती सरकारच्या दुय्यम समितीनें तिची छाननी केली. ह्या दोहोंचे अभिप्राय सरकारनें आतां लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केले आहेत. ह्या योजनांची स्थूलमानाची कल्पना देणें आवश्यक आहे.

---

## रस्तेविस्तारांतील ठळक बाबी

राष्ट्रीय हमरस्ते व त्यांस जोडावयाच्या पुस्त्या, प्रांतिक रस्ते, जिल्हा रस्ते व खेडेगांवी रस्ते असें चतुर्विध वर्गीकरण इंजिनिअरांच्या रिपोर्टांत केलें आहे. युद्धसमाप्तीबरोबर करावयाच्या रस्त्यांच्या दुरुस्त्या आणि मोठ्या प्रमाणावरील रस्त्यांचा विस्तार अशी त्यांची दुहेरी योजना आहे. राष्ट्रीय महत्वाचे रस्ते हा सबंद रस्ते विस्ताराचा सांगाडा असून त्यांत बाकीच्या तीन प्रकारांच्या रस्त्यांची मांडणी बसवली जावयाची आहे. राष्ट्रीय हमरस्त्यांचा भांडवली व चालू खर्च मध्यवर्ती सरकारनें करावयाचा असून इतर रस्त्यांच्या खर्चाची जबाबदारी प्रांतिक सरकारावर पडेल. एकूण रस्त्यांपैकीं एक लक्ष सत्तेचाळीस हजार मैल लांबीच्या रस्त्यांचा पृष्ठभाग सडीसारख्या कठिण द्रव्याचा केला जाईल आणि दोन लक्ष त्रेपन हजार मैल लांबीचे रस्ते मातीचे असतील. या दोन जातींच्या रस्त्यांची सध्याची लांबी अनुक्रमें ७९ हजार व १,९३,००० मैल अशी आहे. ह्या तुलनात्मक आंकड्यांवरून योजलेल्या रस्त्यांच्या विस्ताराची कल्पना येईल. प्रांतिक सरकारांनीं आपापल्या योजना प्रथम स्थूलमानानें तयार करून त्या येत्या ऑगस्ट अखेरपर्यंत मध्यवर्ती सरकारकडे पाठवाव्या आणि तपशीलवार योजना वर्षअखेर तयार व्हाव्या अशी सूचना आहे. सर्व रस्ते सुस्थितींत ठेवण्याचा वार्षिक खर्च सोळा कोटि रुपये येईल असा अंदाज आहे. युद्धाचे अखेरीस सैन्यांतून बाहेर परत येणाऱ्या लोकांस रस्त्यांच्या बांधणीच्या कामीं रोजगार देतां आल्यानें अशा लोकांच्या बेकारीचा प्रश्न सुटेल. तसेंच, युद्धासाठी उपयोगांत आलेलीं व रिकामीं झालेलीं यंत्रें, हत्यारें इत्यादि रस्त्यांच्या कामासाठी वापरणें सोयीचें व अल्पखर्चाचें होईल असें समितीचें म्हणणें आहे. रस्ते दाबून बसविण्यासाठी बाराशे रूळ लागतील, त्यांची मागणी एव्हांपासून केली जावी असें तिनें सुचवलें आहे. रस्त्यांच्या संबंधांत उद्भवणाऱ्या प्रश्नांचा निकाल लावण्यासाठी एक स्वतंत्र बोर्ड स्थापन करण्यांत यावें आणि त्यानें एकसूत्री धोरण, कार्यक्रम व व्यवस्था ह्यांविषयींची काळजी घ्यावी अशी समितीची सूचना आहे.

---

## रेलवे-मोटार वहातुक

देशांत चांगल्या रस्त्यांचा विस्तार झाला म्हणजे मोटारींची वहातुक मोठ्या प्रमाणांत वाढणें स्वाभाविक आहे, किंबहुना, खेडेगांवांचा व्यापाराच्या बाजारपेठांशीं निकट संबंध जोडला जाण्यावर आर्थिक प्रगति पुष्कळांशीं अवलंबून रहाणार आहे. आतांपर्यंत रेलवेज आणि मोटारी ह्यांची वहातुकीचे बाबतींत स्पर्धा होत आली आहे आणि त्यांच्या हितसंबंधांचा मेळ घालणें अवघड झालें आहे. सरकारी समितीचें असें मत आहे कीं, रेलवेजना करतां न येण्यासारखें वहातुकीचें कितीतरी काम मोटारबसेसना करावें लागेल आणि त्यांत स्पर्धेचा प्रश्न उद्भवूं शकत नाहीं. मोटारवहातुक खेडेगांवी भागांत सर्वत्र संचरली पाहिजे आणि तिनें शेतीच्या मालाची वहातुक करून आर्थिक व सामाजिक प्रगतीस सहाय दिलें पाहिजे. ह्यासाठीं मोटारवहातुकीस उत्तेजन देण्याचा उपक्रम सरकारनें युद्धकाळांतच करावा असें समितीचें सांगणें आहे. ह्या धोरणाच्या योगानें पुढची प्रगति सोपी होईल असें तिचें मत आहे. युद्धांत मोटारी हाकण्याचें काम केलेले हजारों इसम मोकळे होतील, त्यांना ह्या वाढत्या वाहतुकींत काम मिळेल अशी अपेक्षा आहे. थोड्या अंतरावर व्हावयाच्या शेतीच्या मालाच्या ने-आणीसाठी मोटार वहातुकीस उत्तेजन दिलें जावें आणि लांब पल्ल्याच्या वहातुकीचा धंदा रेलवेजनीं करावा अशी समितीची कल्पना आहे. प्रवाशांच्या वहातुकीचे बाबतींत रेलवेज आणि मोटारी ह्यांचेमध्यें अनिष्ट स्पर्धा होऊं देतां कामा नये. त्यांचीं क्षेत्रें पायाशुद्ध रीतीनें निश्चित केलीं जावीं आणि ह्याविषयींची व्यवस्था प्रत्येक प्रांतानें स्वतःसाठी करावी. तसेंच वहातुकीचें स्वतंत्र असें मध्यवर्ती बजेट असावें आणि हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांचे दरम्यान भांडवली व इतर खर्चाची प्रमाणशीर वाटणी केली जावी अशी समितीची शिफारस आहे. सबंद हिंदुस्थानासाठी एक रोड बोर्ड स्थापलें जावें आणि विस्ताराच्या योजनेची अंमलबजावणी त्याकडे सोपवण्यांत यावी अशी तिची सूचना आहे. हिंदुस्थान सरकारनें वरील योजना आणि शिफारसी अजून मान्य केलेल्या नाहींत. लोकांकडून त्यांवर सूचना केल्या जातील त्या सरकार विचारांत घेईल आणि नंतर स्वतःचें मत कळवील असें प्रसिद्ध झालें आहे. प्रांतिक सरकारें स्वतःच्या गरजा आणि सांपत्तिक सामर्थ्य ह्यांच्या दृष्टीनें आपापल्या योजना ठरवतील त्यांची आणि अखिल भारतीय योजनेची छाननी सबंद राष्ट्राचें हित व व्यवहार्यता ह्यांचे भूमिकेवरून व्हावी लागेल.

### बँकांच्या ठेवी व त्यांनीं दिलेलीं कर्जें

हिंदी बँकांच्या ठेवी वाढत चालल्या आहेत, परंतु त्या प्रमाणांत त्यांनी दिलेलीं कर्जें वाढत नाहींत, हें त्या बँकांच्या व्यवहाराच्या आकड्यांवरून स्पष्टपणें दिसून येतें. १-९-३९ रोजीं शेड्यूल्ड बँकांकडे २३७ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या व त्यांनीं १०५ कोटि रुपयांचीं कर्जें दिलेलीं होतीं. ३१-१२-४३ चे तत्सम आकडे ६५८ कोटि रुपयांच्या ठेवी व १६८ कोटि रुपयांचीं कर्जें असे आहेत. म्हणजे, कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ४४·४२% पडत होतें, तें २५·४७% वर आलें आहे. अर्थात, बँकांच्या रोख शिल्लका व सरकारी रोख्यांतील गुंतवणूक वाढली आहे. ग्रेट ब्रिटनमधील बँकांच्या व्यवहारांची परिस्थिति ह्याच प्रकारची आहे. तेथील बँकांकडील ठेवींची रक्कम १९३८ सालीं २२७ कोटि पौंड होती, ती १९४३ अखेर ४०० कोटि पौंडांवर गेली आहे. त्यापैकीं फक्त १८·४% रकमेचीं कर्जें देण्यांत आलीं आहेत व बाकीचा पैसा मुख्यतः सरकारी रोख्यांत गुंतलेला आहे. लॉइड्स बँकेचे अध्यक्ष, लॉर्ड वॉर्डिंग्टन, ह्यांनीं ह्या प्रश्नावर विचार व्यक्त करतांना "एका प्रकारें बँकांजवळ कर्जें देण्याचा हा रिझर्व्ह फंडच निर्माण झालेला आहे" असे उद्गार काढले. साधारणतः ठेवींच्या निम्म्या रकमेइतकीं कर्जें बँका देऊं शकतात, ह्या हिशेबानें ब्रिटिश बँका सरकारी रोख्यांतून १२७ कोटि पौंड काढून तेवढ्या रकमेचीं कर्जें देऊं शकतील, असें त्यांचें म्हणणें आहे. अर्थात, युद्ध संपल्यानंतर पुनर्घटनेचें काम पुरें होण्यास बरींच वर्षें लागतील व बँकांकडून घेतलेले पैसे किफायतशीर गुंतविण्याची खात्री असल्याविना कर्जें कोणी घेणार नाहींत. हिंदी बँकांजवळहि, १९३९ च्या तुलनेनें, आणखी १०० कोटि रुपयांचीं कर्जें देण्याचा रिझर्व्ह निर्माण झालेला आहे व तो सरकारी रोख्यांत आज गुंतलेला आहे, असें म्हणतां येईल. बँकांनीं सढळ हातांनीं कर्जें देणें, म्हणजे तारणाकडे दुर्लक्ष करणें नव्हे, हें उघड आहे. तथापि, बँकांचे अधिकाधिक पैसे कर्जांत गुंतविण्यांत यावयाचे असतील, तर कर्जें देण्याची त्यांची पद्धत अधिक सोपी करावी लागेल व कर्जें देतांना प्रत्यक्ष तारणाइतकेंच महत्त्व कर्ज घेणारांच्या सचोटीस व लायकीस देऊन उद्योन्मुख कर्तबगार लोकांना बँकांनीं वाव द्यावा लागेल. युद्धोत्तर बँकिंगच्या पद्धतींत, संस्थेच्या मजबुतीस बाध न आणतां कर्जदारास अधिकाधिक पैसा कसा उपलब्ध करून देतां येईल, ह्याचा काळजीपूर्वक विचार त्यांना करणें जरूर पडेल.

---

### भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

वरील बँकेनें १९४३ सालीं उल्लेखनीय प्रगति केली आहे. बँकेचें खेळतें भांडवल आतां सुमारें १८ लक्ष रुपये झालें आहे. बँकेनें ५½ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत व तिचे सरकारी रोख्यांत ६ लक्ष, ६१ रुपये आहेत. १९४३ सालीं बँकेस निव्वळ नफा १५ हजार रुपये झाला, त्यांत रोख्यांच्या विक्रींतील नफ्याचे ८ हजार रुपये आहेत. नफ्यापैकीं ३,०२५ रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून, ४ हजारांचा प्राथमिक खर्च बँकेनें जिंदगीच्या बाजूकडून काढून टाकला आहे. ऑर्गनायझेशन खर्चाची बाब ३ हजारांनीं कमी करून टाकण्यांत आली आहे. क्यु. प्रे. भागांस ६% व ऑर्डिनरी भागांस ४% डिव्हिडंड मिळालें. पुणें कॅन्टोन्मेंट व बारामती येथें शाखा व खोपोली (जि. कुलाबा) येथें पे-ऑफिस उघडण्यांत आलें आहे व त्या सर्वांचें काम समाधानकारक चालू आहे.


**जिकडे तिकडे प्रशंसा**

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

**मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध**

**मागोरा पिल्स**

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.

टिळक रोड, पुणें २.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

**छाया** लॉजिंग व बोर्डिंग हाउस

बुधवार चौक, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे

(सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले)

**टोमॅटो केचप (गोड) व**

**टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिसः ९१३ अ सदाशिव, पुणें २.

### ऑस्ट्रेलियापुढील लोकसंख्येचा प्रश्न.

ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या त्या देशाच्या विस्ताराचे मानानें अत्यल्प आहे व युद्धांत बरेच ऑस्ट्रेलियन लोक कामास येतील, ह्या दृष्टीनें लोकसंख्येचा प्रश्न तेथें युद्धानंतर अधिकच अवघड होऊन बसणार आहे. गेल्या पन्नास वर्षांत ऑस्ट्रेलियांतील जननाचें प्रमाण सुमारें ५०% उतरलें आहे. १९११ मध्यें ऑस्ट्रेलियन कुटुंबांत सरासरीनें ३·३ मंडळी असत; १९४० चा तत्सम आकडा २·४ होता. ह्या कुटुंबाच्या आकारानें लोकसंख्येंत फारशी वाढ होणें अशक्य आहे. ऑस्ट्रेलियांत २ ते ३ कोटि लोकांस, सध्यांच्या रहाणीच्या दर्जानें सुद्धां, सहज रहातां येईल, असें तज्ञांचें मत आहे. पश्चिम ऑस्ट्रेलिया, दक्षिण ऑस्ट्रेलिया व उत्तर ऑस्ट्रेलिया मिळून हिंदुस्थाना एवढा मुलूख होतो परंतु त्यांतील लोकसंख्या १० लाखांपेक्षां अधिक नाहीं ! बाकीच्या ऑस्ट्रेलियांत ६० लाखांची वस्ती आहे. ऑस्ट्रेलियाच्या आत्मरक्षणासाठी निदान २ कोटि लोकसंख्येची आवश्यकता आहे, असें त्या देशाचे मुख्य प्रधान, मि. कर्टिन, हें सांगतात. बाहेरून रहिवासी आकर्षून केवळ ही वाढ होणार नाहीं. प्रत्यक्ष ग्रेटब्रिटनमधूनहि फारसे लोक ऑस्ट्रेलियांत स्थाइक होण्यासाठीं जाऊं शकतील, अशी ग्रेट ब्रिटनमधील प्रजावृद्धीची परिस्थिति नाहीं. ज्यांचे वडील युद्धांत अथवा बाँब हल्ल्यांत मरण पावले, अशा मुलांना ऑस्ट्रेलियांत पाठविल्यास सर्वांचीच सोय होणार आहे, असें सुचविण्यांत येत आहे. युरोपांतूनहि कांहीं लोक ऑस्ट्रेलियांत जाण्यास तयार होतील. कित्येक अमेरिकन लोकांस ऑस्ट्रेलिया उद्योगधंद्यासाठी पसंत पडण्याचा संभव आहे व तेथें अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणुकीस मोठा वाव आहे. सहाजिकच, सध्याच्या मुख्यतः ब्रिटिश रक्ताच्या ऑस्ट्रेलियांत त्यामुळें बिगर-ब्रिटिश रक्ताच्या लोकांस वाव मिळेल, परंतु लोकसंख्या वाढविण्यासाठी बाहेरील योग्य लोकांना आकर्षण्यावाचून त्या देशास गत्यंतर नाहीं. ब्रिटिश, अमेरिकन, स्कँडिनेव्हिअन व बाल्कन्समधील लोक ह्यामधूनच ऑस्ट्रेलिया आपल्या पाहुण्यांची निवड करील; हिंदी लोकांना तेथें जागा नाहीं, हें उघड आहे.

---

### मध्यप्रांत-वऱ्हाडांत उद्योगधंद्यांच्या वाढीस वाव

मध्यप्रांत व वऱ्हाडमध्यें कापसाच्या एकूण १० गिरण्या आहेत, त्यांत ६,०७७ माग व ३,३६,४०२ चात्या आहेत. गिरणी कामगारांची संख्या सुमारें २४ हजार आहे, परंतु सध्या रात्रपाळी चालू असल्यामुळें ती जवळ जवळ दुप्पट झाली आहे. मध्यप्रांत वऱ्हाडांतून दरसाल २५ लक्ष मण कपास निर्गत होते, तेव्हां त्या प्रांतांत आणखी गिरण्या निघण्यास सहज वाव आहे. नागपूर येथील एम्प्रेस मिल सुप्रसिद्धच आहे. कपाशीच्या जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरींत २५½ हजार लोकांना काम आहे. तेलाच्या गिरण्यांची संख्या ४७ असून त्यांत १,८०० कामगार आहेत. कटनी, मेहगांव व किमोर येथें सिमेंटचे कारखाने आहेत त्यांतील फक्त शेवटच्या ठिकाणचाच कारखाना चालू आहे. गोंदिया व जबलपूर येथें प्रत्येकीं एक आणि नागपूर येथें दोन असे काचकारखाने आहेत. जबलपूर गनकॅरेज फॅक्टरीस सध्यां युद्धामुळें महत्त्व प्राप्त झालें झालें आहे. मध्यप्रांत-वऱ्हाड ह्यांत नैसर्गिक संपत्तीची विपुलता आहे. विशेषतः त्या प्रांतांतील लोखंड, मँगनीज, बक्साइट, ह्यांच्या उत्खननास पुष्कळ वाव आहे. बुलढाणा जिल्ह्यांतील लोणार तळ्याच्या पाण्यांत सोडियम कार्बोनेट आढळतो त्यापासून सोडा ॲशचें उत्पादन किफायतशीर रीतीनें करतां येण्याजोगें आहे.

### हिंदुस्थानांत आयुर्विम्यास प्रारंभ

हिंदुस्थानांतील मुख्यतः युरोपियन रहिवाशांचे विमे उतरण्यासाठी ब्रिटिश विमा कंपन्यांनीं १९ व्या शतकाच्या मध्याचे सुमारास हिंदुस्थानांत शाखा स्थापन केल्या. ओरिएंटल विमा कंपनीची स्थापना १८१८ सालीं कलकत्ता येथें झाली ( मुंबईची सुप्रसिद्ध ओरिएंटल विमा कंपनी ही नव्हे ) परंतु १८३४ मध्यें ती बुडाली. मद्रास इक्विटेबल इं. कंपनीची १८२९ सालीं स्थापना झाली; ही पहिली खरीखुरी हिंदी विमा कंपनी होय. ती गेल्या महायुद्धानंतर लवकरच बुडाली. स्टँडर्ड लाइफ ॲशुअरन्स कंपनी ऑफ एडिंबरोनें १८४६ मध्यें हिंदी क्षेत्रांत प्रवेश करून आयुर्विम्याचें काम मिळविण्यास प्रारंभ केला. तिचे मागोमाग इतरहि ब्रिटिश व विदेशी कंपन्या आल्या. गेल्या शतकाचे अखेरीस कांहीं हिंदी कंपन्या अस्तित्वांत आल्या परंतु त्यांच्या संख्येंत खरी वाढ चालू शतकाचे प्रारंभींच झाली. श्री. ए. वैद्यनाथन ह्यांनीं वरील माहिती “ इंडियन पॉलिसी होल्डर ” मधील आपल्या लेखांत दिली आहे.

---

### युद्धोत्तर शिक्षणाची योजना

हिंदुस्थानांतील युद्धोत्तर शिक्षणप्रगतीची आपली योजना सेंट्रल ॲडव्हायसरी बोर्डानें व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाच्या पुनर्घटना समितीस सादर केली आहे, ती मुख्यतः सरकारचे शिक्षणतज्ञ, मि. जॉन सार्जंट, ह्यांच्या सल्ल्यावरच आधारलेली आहे. हिंदुस्थानांतील सर्व मुलांना किमान कांहींतरी शिक्षण मिळावें व लायक विद्यार्थ्यांस हायस्कुलें व कॉलेजें ह्यांत प्रवेश मिळावा, व्यावसायिक शिक्षणाची इतर शिक्षणाचे बरोबरीनें व्यवस्था व्हावी, शिक्षकांच्या शिक्षणाचीहि सोय असावी, सहा ते चौदा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचें असावें, प्राथमिक व मिडल् स्कूल शिक्षणास फी आकारण्यांत येऊं नये, हायस्कुलांत फक्त निवडक मुलांसच प्रवेश मिळावा, शिक्षकांचा दर्जा सुधारण्यांत यावा, ही सबंध योजना ४० वर्षांत पुरी करावी, ४० वर्षांनंतर शिक्षणाच्या वार्षिक खर्चांत ३१२ कोटि रुपयांची भर पडेल तोंपर्यंत हा खर्च दरसाल हळुहळु वाढत जावा, इत्यादि सूचना ॲडव्हायसरी बोर्डानें केलेल्या आहेत.

---

### मलेरिया—जपान व अमेरिका ह्या दोघांचाहि शत्रू

पॅसिफिक महासागरांतील बेटांमधील मलेरियाशी टक्कर देणें जपानचा पराभव करण्यापेक्षाहि बिकट आहे, असा अमेरिकेचा अनुभव येत आहे. मलेरियाप्रतिबंधक सर्व इलाज हातांशी असूनहि मलेरिया हटविणें कठीण जात आहे. तेथें दररोजच पाऊस पडून डबकीं साठतात व डोक्याइतकें उंच गवत वाढतें, त्यावर मलेरियाचे डास फोफावतात. अशा प्रकारच्या मुलुखांतच सैन्यास सर्व हालचाली कराव्या लागतात. ॲटेब्रीननें मलेरिया थांबवितां येईल ही अपेक्षा आतां खोटी ठरली आहे. लष्करी डॉक्टर मलेरियाचा प्रतिबंध कसा करतां येईल ह्यासंबंधीं संशोधन करीत आहेत. मलेरियाचा त्रास फक्त अमेरिकन सैनिकांनाच होतो, असें नाहीं; जपानी सैनिकहि मलेरियास बळी पडत आहेत. पकडलेल्या जपानी युद्धकैद्यांस तपासलें तर ते पूर्वी मलेरियानें पछाडलेले असल्याचें आढळून येतें. अमेरिका व जपान ह्यांचे एकमेकांवरील हल्लेच युद्ध ठरवून संपविण्यास जेवढ्या प्रमाणावर कारणीभूत होतील, तेवढ्याच प्रमाणावर मलेरियाचा यशस्वी प्रतिकारहि कारणीभूत होईल, असें सांगण्यांत येतें.

# मानापमान—स्वयंवर

## संयुक्त प्रयोग !

## नाहीं मी बोलत—

**आतांपासून तो थेट खडा मारायचा झाला तर...**
**पर्यंतचे रुसव्या-फुगव्याचे-लटक्या अबोल्याचे**
**हसी-खुषीचे-लडीवाळपणाचे**
**अभिनय कौशल्याचे सारे सारे प्रकार ह्या पनघटावरील**
**प्रेमपुतळींत आढळतात !**



# ७ वा आठवडा !

प्रकाश पिक्चर्सचा प्रेक्षणीय बोलपट — एव्हरग्रीन रिलीज—

# पनघट

**भूमिका :—रत्नमाला, उमाकांत, जीवन**

## ग्लोब पुणें—रोज ६॥ व १० वा.

शनि. रवि. सोम. दु. ३॥ वाजतां जादा खेळ.

---

गेल्या शनिवारीं

## " राम-कृष्ण " भेट !

" श्रीकृष्ण " मंदिरांत

### श्रीरामचंद्र प्रभु अवतरले !

प्रकाशचा प्रेक्षणीय मराठी बोलपट

# रा म रा ज्य

दिग्दर्शक:—विजय भट्ट

**भूमिका: शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी**

## श्रीकृष्ण, पुणें

दररोज ३ खेळ
३–६ व १० वा.

### २१ वा आठवडा !

---

## खास लोकाग्रहास्तव

### आणखी एक आठवडा वाढला !

## १४ वा आठवडा !

रॉयल रत्न १८ वें

# महात्मा विदुर

**भू.—कै. विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे**
**नायमपल्ली, मनोहर घटवाई, प्रल्हाद**

## आर्यन, पुणें

दररोज तीन खेळ
३, ६॥ व १० वाजतां

---

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.